# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 06/08/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### चोरी

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावरील मौजा घोगली येथे दि. 01/08/2021 ते 02/08/2021 चे रात्री सुमारास फिर्यादी नामे– सोनम टेलीराम बोरकर, वय 30 वर्ष, रा. घोगली हि आपले बांधकाम सुरू असलेल्या खुल्या मकाणात जेवण करून आराम करित असतांना रात्री उठुन पाहीले असता तीने ठेवलेली खुर्ची वरील बॅग तिला मिळुन आली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या खुल्या मणातुन बॅगमधील 40,000/–रू. नगदी व 19 तोळयाची चांदीची जुनी पायपटटी कि 10,000/–रू. व जुना मोबाईल कि 3,000/–रू. असा एकुण कि. 53,000/–रु. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नावेद मोन 8208511663 हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावरील मौजा ब्राम्हणी स्टेशन जवळ तह. उमरेड येथे दि. 04/08/2021 चे 10.00 वा. ते 05/08/2021 ते 08.00 वा. सुमारास फिर्यादी नामे– सिदृदी रमा रेड्डी व्यंकटरमै, वय 42 वर्ष, रा. ग्राम आन्नतपुरम जि. नैतुल राज्य. आंध्र प्रदेश. ह.मु. ब्रामणी रेल्वे स्टेशन जवळ तह. उमरेड हा पि.व्ही.आर. कंन्स्ट्रक्शन कंपनी ची साईड ब्राम्हणी येथे रेल्वे चे सेंट्रीग ठेकेदार चे काम पाहतो. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी काम करणारे लोकांनी फिर्यादीस फोन करून सांगीतले की, ब्रिज जवळील ठेवलेला 1) 20 सेंटींग प्लेटा, वजन 12 क्विंटल 80 किलो ग्राम कि. 92,160/–रू. 2) 2 जॅक कि, 3,000/–रू. 3) 25 एम एम 60 लोहा सलाखी कि. 2,000/–रू. 4) सोल्जर कि. 3,000/–रू. असा एकुण 1,00,160/– रू. चा माल बोलेरो पिकअप मालवाहु गाडी एम.एच– 49/ए.टी– 3022 चा चालक आरोपी नामे– 1) विजय शालीकराम डोनारकर, रा. नागपुर, 2) प्रतिक माणिकराव फुलझले रा. कामठी, 3) पंकज प्रभुदास बोरकर रा. कामठी, 4) पापा उर्फ राजेंद्र ठाकुर नाईक रा. कामठी व 5) रितेश हरी जांभुळकर रा. दुर्गा वती चौक नागपुर आणि त्याचे सोबत काम करणारे लोकांनी चोरून घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अरून जयसिंगपुरे मो. नं. 9049175485 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर